# धुरी एक्सप्रेस

● वर्ष १ ● अंक २ ● कोकण ● सोमवार, २१ ते रविवार, २७ सप्टेंबर २०२६ ● किंमत २ रुपये





# अचानक वातावरणात बदल

## राज्यात पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज

धुरी एक्सप्रेस वृत्तसंस्था

**मुंबई** : राज्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाने काही भागांत दडी मारल्याने शेतकरी चिंतेत आहेत. सप्टेंबर महिन्याचा उत्तरार्ध सुरू झाला असताना पावसाची प्रतीक्षा कायम आहे. अशातच हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी राज्यातील अनेक भागांत आगामी चार दिवसांत पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

पंजाबराव डख यांच्या अंदाजानुसार, २० ते २४ सप्टेंबरदरम्यान राज्यातील विविध भागांत पावसाची शक्यता आहे. विशेषत: यंदा तुलनेने कमी पाऊस झालेल्या दक्षिण महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भातील काही जिल्ह्यांना या पावसाचा फायदा होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

### या जिल्ह्यांत पावसाची शक्यता

नांदेड, यवतमाळ, हिंगोली, अकोला, अमरावती, बुलढाणा, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, लातूर, बीड, परभणी, जालना, धाराशिव, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे, अहिल्यानगर तसेच कोकणातील विविध जिल्ह्यांत चांगला पाऊस होण्याचा अंदाज आहे. या पावसामुळे ओढे-नाले भरून वाहण्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केली आहे.

### उत्तर महाराष्ट्रातही पावसाची शक्यता

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव आणि संगमनेर परिसरात २० सप्टेंबर रोजी भाग बदलून विखुरलेल्या स्वरूपात पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यानंतर २१ ते २४ सप्टेंबरदरम्यान या भागात पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज डख यांनी व्यक्त केला आहे.

### दक्षिण आणि पश्चिम महाराष्ट्राला दिलासा?

सांगली, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, अहिल्यानगर, धाराशिव, लातूर, बीड, परभणी, नांदेड, हिंगोली, वाशिम, छत्रपती संभाजीनगर आणि यवतमाळ परिसरात २४ सप्टेंबरपर्यंत चांगला पाऊस होण्याची शक्यता असल्याचे डख यांनी सांगितले.

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा, पंढरपूर, जत, आटपाडी आणि सांगोला परिसरातही पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तसेच धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर आणि नळदुर्ग परिसरातही चांगला पाऊस होण्याचा अंदाज आहे.

मुंबईसह कोकणातही पावसाचा जोर

मुंबईसह कोकण किनारपट्टी भागात आगामी काळात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. कोकणातील काही भागांत मुसळधार पाऊस होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. विदर्भात रात्रीच्या वेळी विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस होण्याची शक्यता असल्याचेही डख यांनी सांगितले.

### २० ते २३ सप्टेंबरदरम्यान जोरदार पावसाचा अंदाज

सांगली, कोल्हापूर, सोलापूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर, धाराशिव, परभणी, नांदेड, जालना, वाशिम, हिंगोली आणि यवतमाळ या जिल्ह्यांत २० ते २३ सप्टेंबरदरम्यान पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. अचानक वातावरणात बदल होऊन काही भागांत जोरदार पाऊस पडू शकतो, असा अंदाज पंजाबराव डख यांनी व्यक्त केला आहे.

# भक्तिमय वातावरणात बाप्पाला निरोप

## राज्यभर गौरी-गणपती विसर्जनाचा उत्साह

धुरी एक्सप्रेस वृत्तसंस्था

**मुंबई** : राज्यभरात गौरी-गणपतीला भक्तिमय वातावरणात भावपूर्ण निरोप देण्यात आला. मुंबई, ठाणे, पुणे यांसह विविध जिल्ह्यांत गणेश विसर्जनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषाने विसर्जनस्थळांचा परिसर दुमदुमून गेला.

मुंबईत एकूण १ हजार ९५१ गणपती व गौरीमातेच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. विविध तलाव व विसर्जनस्थळी सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. पुण्यातही घरगुती गणपतींना निरोप देण्यासाठी नदीकाठावर नागरिक मोठ्या संख्येने दाखल झाले होते. खालापूर तालुक्यातही गौरी-गणपती विसर्जन भक्तिमय वातावरणात पार पडले. बाप्पाला निरोप देताना भाविक भावुक झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

दरम्यान, चिपळूणमधील ऐतिहासिक गोळकोट गावात यंदा अनोख्या आणि शिस्तबद्ध पद्धतीने गणपती विसर्जन मिरवणूक पार पडली. करंजेश्वरी मंदिरातील गावकऱ्यांचा मानाचा गणपती पालखीत अग्रभागी होता, तर इतर गणेशमूर्ती भाविक डोक्यावर घेऊन विसर्जन घाटाकडे रवाना झाले. या अनोख्या विसर्जन सोहळ्याचे सर्वत्र कौतुक झाले. पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळाच्या १३४व्या गणेशोत्सवा निमित्त वृंदावन येथील प्रेम मंदिराची भव्य प्रतिकृती साकारण्यात आली होती.



गणरायाच्या दर्शनासह देखावा पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली. या मनमोहक दृश्यांचे ड्रोनद्वारे चित्रण करण्यात आले.

विरार येथील खामकर कुटुंबीयांनी गणेशोत्सवानिमित्त 'बगाड यात्रा' या पारंपरिक संकल्पनेवर आकर्षक देखावा साकारला. वाई-सातारा परिसरातील बगाड यात्रेची परंपरा या देखाव्यातून दाखवण्यात आली. काळूबाई मंदिर, दीपमाळ आणि जत्रेतील विविध घटकांची प्रतिकृती साकारण्यात आली असून, महाराष्ट्राच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे सुंदर दर्शन यातून घडले. मुंबईतील अंधेरी येथील मनोहर अजिंक्य यांच्या घरी 'स्ट्रेट ऑफ हॉर्मुझ' या महत्त्वाच्या समुद्री मार्गावर आधारित देखावा साकारण्यात आला. नैसर्गिक आणि टाकाऊ वस्तूंचा वापर करून पर्यावरणपूरक आणि संदेश देणारा देखावा तयार करण्यात आला. सायनच्या प्रतीक्षानगर येथील विशाल काटकर यांच्या घरी पर्यावरणपूरक देखावा साकारण्यात आला. 'अंबुधिपती कर्केश अवतार' या संकल्पनेवर आधारित या देखाव्याने भाविकांचे लक्ष वेधून घेतले.

मिरा रोडच्या महाजनवाडीतील संकेत तळपे यांच्या घरी पर्यावरणपूरक आणि स्वामींची अनुभूती देणारा देखावा साकारण्यात आला. तर गोरेगाव येथील अनूप योगवघे यांच्या घरी गणेशमूर्ती स्वत: तयार करून कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय या आधुनिक संकल्पनेवर आधारित अनोखा देखावा उभारण्यात आला.

विरारमधील द्वारका नगरी संकुलात पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्यात आला. विधिवत प्रतिष्ठापना, आरती, पारंपरिक वेशभूषा आणि विविध कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसर गणेशमय झाला.

शहापूर तालुक्यातील सापगाव येथे बाळूभाऊ भांडे यांच्या घरी 'सोन्याची जेजुरी' हा भव्य देखावा साकारण्यात आला. जेजुरी गडाची प्रतिकृती, दगडी कमानी, दीपमाळ आणि मंदिर परिसराची हुबेहूब रचना या देखाव्याचे आकर्षण ठरली. चंद्रपूरमध्ये प्रशासनाच्या वतीने गणेश मंडळांसाठी देखावे व सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. श्री नवयुवक गणेश मंडळाने सलग सहाव्या वर्षी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. यंदा मंडळाने निसर्गाचे होणारे शोषण थांबवण्याचा संदेश देत पर्यावरण संवर्धनावर आधारित देखावा साकारला. नाशिक शहरातील रामराव पाटील यांनी फुले, झाडे आणि पानांचा वापर करून पर्यावरणपूरक आरास तयार केली. नागरिकांनीही पर्यावरणपूरक गणपती व आरास साकारावी, असे आवाहन पाटील परिवाराने केले.

# गणपती विसर्जनासाठी रात्री उशिरा धावणार २२ विशेष लोकल

## मुंबई-अहमदाबाद महामार्गावर अवजड वाहनांना बंदी

धुरी एक्सप्रेस वृत्तसंस्था

**मुंबई**: गणेशोत्सवाच्या काळात रात्री उशिरापर्यंत गणेशदर्शन करून घरी परतणाऱ्या भाविकांसाठी मध्य रेल्वेने दिलासादायक निर्णय घेतला आहे. विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वे २२ विशेष उपनगरीय फेऱ्या चालवणार आहे. यामध्ये मुख्य मार्गावर १८ आणि हार्बर मार्गावर ४ फेऱ्यांचा समावेश असून, यामुळे मध्यरात्रीनंतरही ठाणे, कल्याण आणि पनवेलच्या दिशेने प्रवास करणे शक्य होणार आहे.

विसर्जना दरम्यान होणारी वाहतूककोंडी टाळण्यासाठी पालघर जिल्ह्यातील मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वर जड व अवजड वाहनांच्या वाहतुकीवर निर्बंध लादण्यात आले आहेत.

गुजरातकडून घोडबंदर, वर्सोवा, ठाणे, मुंबई आणि नवी मुंबईकडे जाणाऱ्या अवजड वाहनांची वाहतूक २० आणि २५ सप्टेंबर रोजी विसर्जन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बंद राहील.

### विशेष लोकलचे नियोजन आणि वेळापत्रक

- **मुख्य मार्ग (२३/२४, २४/२५ आणि २५/२६ सप्टेंबर - एकूण १८ फेऱ्या)**
  **या तीन रात्री दररोज ६ विशेष फेऱ्या धावतील:**
- **सीएसएमटी वरून सुटणाऱ्या गाड्या:**
  **सीएसएमटी ते कल्याण - मध्यरात्री १:४० वा.**
  **सीएसएमटी ते ठाणे - मध्यरात्री २:३० वा.**
  **सीएसएमटी ते कल्याण - मध्यरात्री ३:२५ वा.**
- **सीएसएमटीच्या दिशेने येणाऱ्या गाड्या:**
  **कल्याण ते सीएसएमटी - मध्यरात्री १२:०५ वा.**
  **ठाणे ते सीएसएमटी - मध्यरात्री १:०० वा.**
  **ठाणे ते सीएसएमटी - मध्यरात्री २:०० वा.**
  **हार्बर मार्ग (केवळ २५/२६ सप्टेंबर - एकूण ४ फेऱ्या)**
- **सीएसएमटी ते पनवेल: मध्यरात्री १:३० वा. आणि २:४५ वा.**
  **पनवेल ते सीएसएमटी:मध्यरात्री १:०० वा. आणि १:४५ वा.**

# पावसाच्या खंडाचा भातपिकाला फटका

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी तातडीच्या उपाययोजनांचे निर्देश

धुरी एक्सप्रेस वृत्तसंस्था

**सिंधुदुर्ग** : पावसाने ओढ दिल्याने जिल्ह्यात काही भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून त्याचा परिणाम भातपिकावर झाला आहे. काही ठिकाणी भातपीक करपल्याच्या तक्रारी समोर आल्याच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री नितेश राणे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश दिले.

सावंतवाडी, वेंगुर्ला आणि वैभववाडी तालुक्यांत भातपिकाच्या नुकसानीची प्रकरणे प्रशासनाकडे दाखल झाली आहेत. या पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष नुकसानीची वस्तुनिष्ठ माहिती संकलित करून किती क्षेत्र बाधित झाले आहे, याची स्पष्ट नोंद करण्याचे निर्देश देण्यात आले. उपलब्ध माहितीनुसार पुढील मदत व उपाययोजनांचे नियोजन करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. बैठकीला जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, जिल्हा नियोजन अधिकारी यशवंत बुधावले, कृषी उपसंचालक ज्ञानेश्वर बढे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

भातपिकाच्या नुकसानीसोबतच जिल्ह्यातील विविध विकासकामे आणि जिल्हा वार्षिक योजनेतून सुरू असलेल्या कामांचीही पालकमंत्र्यांनी माहिती घेतली. उपलब्ध निधीचा योग्य आणि वेळेत वापर करताना कामांच्या गुणवत्तेकडे दुर्लक्ष होऊ नये, यासाठी संबंधित यंत्रणांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे, असे त्यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यातील विकासकामांच्या प्रगतीवर नियमित लक्ष ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. संबंधित अंमलबजावणी यंत्रणांच्या कामकाजाचा दर आठवड्याला आढावा घेण्याची जबाबदारी जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे.

# रायगडमध्ये वापराविना पडून असलेल्या जमिनी सरकारजमा होणार

## २११ कंपन्यांना नोटिसा; १,५७० हेक्टर जमिनीवर कारवाई

धुरी एक्सप्रेस वृत्तसंस्था

**अलिबाग :** औद्योगिक आणि क्लस्टर विकासासाठी घेतलेल्या, मात्र वापराविना पडून असलेल्या जमिनी सरकारजमा करण्याचे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले होते. त्यानुसार महसूल विभागाने अशा जमिनी ताब्यात घेण्याची तयारी सुरू केली असून, रायगड जिल्ह्यातील २११ कंपन्यांना महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियमांतर्गत नोटिसा बजावल्या आहेत. सुनावणीनंतर या जमिनी लवकरच सरकारजमा केल्या जातील.

राज्याचा औद्योगिक जिल्हा म्हणून ओळख असलेल्या रायगडमध्ये सध्या औद्योगिकीकरणाचे वारे वाहत आहेत आणि प्रकल्पांसाठी शेतजमिनी संपादित करण्याचा धडाका सुरू आहे. मात्र अनेक गुंतवणूकदार कंपन्यांनी औद्योगिकीकरणाच्या नावाखाली जमिनी संपादित करूनही त्यावर उद्योग उभारलेले नाहीत, त्या तशाच पडून आहेत. अशा सर्व जमिनींचे सर्वेक्षण करून त्या सरकारजमा करण्याचे निर्देश बावनकुळे यांनी काही दिवसांपूर्वी दिले होते. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने कारवाईच्या हालचाली सुरू केल्या आहेत.

**५,२४० हेक्टरपैकी १,५७० हेक्टरवर कारवाई**

महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम, १९४८ च्या कलम ६३ (एफ) (अ) नुसार जिल्ह्यातील १५ तालुक्यांत ६६६ कंपन्यांनी ५,२४० हेक्टर जमीन संपादित केली होती. यापैकी २११ कंपन्यांनी संपादनानंतर पंधरा वर्षांत जमिनीचा वापर केला नाही आणि उद्योगही उभारला नाही. या कंपन्यांकडील १,५७० हेक्टर जमीन ताब्यात घेण्याची प्रक्रिया जिल्हाधिकारी कार्यालयाने सुरू केली आहे. नोटिसा मिळालेल्यांमध्ये पेण, खालापूर, रोहा आणि पोलादपूर तालुक्यांतील कंपन्यांची संख्या सर्वाधिक आहे. या कंपन्यांच्या प्रतिनिधींनी आवश्यक कागदपत्रांसह अपर जिल्हाधिकाऱ्यांसमोर हजर राहावे, असे आदेश देण्यात आले आहेत.

# मुंबई-गोवा चौपदरीकरणाचा खर्च १७ वर्षांत साडेपाच हजार कोटींनी वाढला

धुरी एक्सप्रेस वृत्तसंस्था

**मुंबई :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणास केंद्र सरकारने मंजुरी दिल्याला १७ वर्षे उलटली असून, या काळात प्रकल्पाचा खर्च सुमारे साडेपाच हजार कोटी रुपयांनी वाढल्याचे माहिती अधिकारातून उघड झाले आहे. महामार्गातील काही अपूर्ण भाग सातत्याने जीवघेणे ठरत असून दरवर्षी कोकणात जाणाऱ्या लाखो प्रवाशांना त्याचा त्रास सोसावा लागतो.

द यंग व्हिसलब्लोअर्स फाउंडेशनचे जितेंद्र घाडगे यांनी दाखल केलेल्या अर्जावर रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने दिलेल्या उत्तरानुसार, ३५५ किमीच्या चौपदरीकरणाच्या दहा पॅकेजची मंजूर किंमत ११,४९९ कोटींवरून १६,९०९ कोटींवर गेली आहे.

ही वाढ सुमारे ४८ टक्के आहे. चिपळूण-रत्नागिरी परिसरातील परशुराम घाट-आरावली या एका पॅकेजचा खर्च ९८३ कोटींवरून २,२२६ कोटींवर पोहोचला असून, १२६ टक्क्यांची ही वाढ सर्व पॅकेजमध्ये सर्वाधिक आहे. आतापर्यंत झालेला खर्च प्रकल्पाच्या मूळ मंजूर अर्थसंकल्पापेक्षाही अधिक असूनही महामार्गाचे मोठे भाग अपूर्ण असल्याकडे घाडगे यांनी लक्ष वेधले.

**जबाबदारी निश्चित नाही**

कोणतीही जबाबदारी निश्चित न करता सरकारने कोकणाची जीवनवाहिनी असलेल्या या महामार्गाकडे खर्चवाढीसाठी ‘एटीएम’ म्हणून पाहिले, अशी टीका घाडगे यांनी केली. पनवेल-इंदापूर टप्प्याचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण करत असताना, महाराष्ट्रातील उर्वरित भागाची जबाबदारी राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देण्यात आली आहे. हे प्रकल्प राष्ट्रीय महामार्ग कार्यक्रमांतर्गतच राबवले जात आहेत.

# न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे काळ्या फिती लावून काम

## सरकारने दखल न घेतल्यास बेमुदत संपाचा इशारा

धुरी एक्सप्रेस वृत्तसंस्था

**सावंतवाडी :** ‘समान काम, समान वेतन“ तत्त्वावर आर्थिक लाभ आणि वेतनवाढ मिळावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या (गट-क) आवाहनानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनी बुधवार, १६ सप्टेंबर रोजी काळ्या फिती लावून काम केले.



मुंबई उच्च न्यायालयाने ३१ जानेवारी २०२५ रोजी दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठवला आहे. वारंवार पाठपुरावा करूनही शासनस्तरावर सकारात्मक निर्णय झालेला नाही, त्यामुळे कर्मचाऱ्यांत तीव्र असंतोष आहे. या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालय आणि राज्य शासनाला आंदोलन व संपाची पूर्वसूचना देण्यात आली होती.

आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील सर्व गट-क कर्मचारी, लघुलेखक, बेलिफ आणि गट-ड कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून निषेध नोंदवला. वकील किंवा पक्षकारांची कोणतीही गैरसोय होऊ न देता आणि न्यायालयीन कामकाजात अडथळा न आणता नियमित कामकाज पार पाडण्यात आले.

शासनाने दखल न घेतल्यास पुढील टप्पे : १६ व १७ ऑक्टोबर २०२६ : पुन्हा काळ्या फिती लावून कामकाज

५ नोव्हेंबर (वसुबारस) : राज्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारी एक दिवसाच्या सामूहिक रजेवर

१७ नोव्हेंबरपासून : मागण्या मान्य न झाल्यास राज्यातील सर्व दुय्यम न्यायालयांतील कर्मचारी बेमुदत संपावर

# सिंधुदुर्गच्या आरोग्य यंत्रणेला मिळणार बळ

## रिक्त पदे आणि प्रलंबित कामे मार्गी लावण्याचे निर्देश

धुरी एक्सप्रेस वृत्तसंस्था

**मुंबई :**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नागरिकांना अधिक तसेच जिल्ह्यात येणाऱ्या नागरिकांना अधिक दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी रुग्णालयांमधील मनुष्यबळ, पायाभूत सुविधा आणि आवश्यक आरोग्य सुविधा सक्षम करण्यावर भर देण्यात आला आहे. आरोग्य व्यवस्थेतील प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवून आवश्यक कामे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रुग्णालयांच्या विविध प्रश्नांवर मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी आमदार दीपक केसरकर, आमदार निलेश राणे यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेतील ङङमनुष्यबळाची कमतरता हा बैठकीतील महत्त्वाचा विषय ठरला.ङङ जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयातील एस-२३ आणि एस-२० श्रेणीतील आवश्यक



विशेषज्ञांची रिक्त पदे भरण्याबाबत चर्चा करण्यात आली. यासोबतच जिल्ह्यातील विविध रुग्णालयांमध्ये वर्ग-१ ते वर्ग-४ संवर्गातील रिक्त पदांची माहिती घेऊन ती भरण्याच्या प्रक्रियेबाबतही आढावा घेण्यात आला. दरम्यान, जिल्हा शल्यचिकित्सक, सिंधुदुर्ग यांनी ङङ७ सप्टेंबर २०२६ रोजी सादर केलेल्या पत्रातीलङङ विविध मागण्यांवरही बैठकीत चर्चा झाली. रुग्णालयांसाठी आवश्यक असलेले अनुदान, प्रस्तावित बांधकामे आणि इतर प्रलंबित बाबींची सद्यस्थिती जाणून घेण्यात आली. आरोग्य सुविधांशी संबंधित कोणतेही काम अनावश्यकपणे प्रलंबित राहू नये आणि नागरिकांना त्याचा थेट लाभ मिळावा, यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या. सिंधुदुर्ग जिल्ह्यात स्थानिक नागरिकांसोबतच मोठ्या प्रमाणात पर्यटक आणि बाहेरून येणाऱ्या नागरिकांची वर्दळ असते. गणेशोत्सवाच्या काळात ही संख्या आणखी वाढते. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन रुग्णालयांमध्ये आवश्यक मनुष्यबळ आणि सर्व सुविधा उपलब्ध असणे गरजेचे आहे. उपलब्ध सुविधांचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार प्राधान्यक्रम निश्चित करावा, अशा सूचना राणे यांनी दिल्या.

आरोग्य व्यवस्थेतील प्रलंबित कामे निर्धारित वेळेत पूर्ण करून नागरिकांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही, याची संबंधित विभागांनी दक्षता घ्यावी. रुग्णालयांमध्ये आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देतानाच नागरिकांना प्रभावी आणि समाधानकारक आरोग्यसेवा मिळेल, यासाठी समन्वयाने काम करावे, असेही मंत्री राणे यांनी निर्देशित केले.

# गणेशोत्सवात टपाल सेवा नागरिकांच्या दारी

धुरी एक्सप्रेस वृत्तसंस्था

**सिंधुदुर्गनगरी :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना टपाल विभागाच्या विविध सेवा सहज उपलब्ध व्हाव्यात, यासाठी भारतीय टपाल विभागाने सिंधुदुर्ग जिल्ह्यात विशेष गणपती नाईट कॅम्प आयोजित केले आहेत. टपालासोबतच वित्तीय, विमा आणि पार्सल सेवांची माहिती व सुविधा नागरिकांना उत्सव काळात उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

सणासुदीच्या काळात नागरिकांपर्यंत टपाल विभागाच्या सेवा अधिक प्रभावीपणे पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या विशेष शिबिरांचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. कॅम्पमध्ये टपाल विभागाच्या विविध योजनांची माहिती बरोबरच संबंधित अधिकारी नागरिकांना वैयक्तिक मार्गदर्शन करणार आहेत.

# कोकण रेल्वेच्या पुनर्रचना पॅकेजमध्ये गोवा-कर्नाटकला प्राधान्य

## सावंतवाडी टर्मिनस, दुहेरीकरणाकडे दुर्लक्ष

धुरी एक्सप्रेस वृत्तसंस्था

**सावंतवाडी :** कोकण रेल्वे महामंडळात महाराष्ट्राचा हिस्सा सर्वाधिक असूनही कोकणातील प्रवाशांच्या पदरी उपेक्षाच पडत असल्याचा आरोप कोकण रेल्वे प्रवासी संघटनेने केला आहे. तिम्रया आर्थिक पुनर्रचना पॅकेजमध्ये गोवा आणि कर्नाटकातील प्रकल्पांना प्राधान्य देण्यात आले, तर महाराष्ट्रातील महत्त्वाकांक्षी सावंतवाडी रेल्वे टर्मिनस आणि दुहेरीकरणाचा मुद्दा डावलण्यात आल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. केंद्र सरकारने तातडीने उपाययोजना न केल्यास तीव्र जनआंदोलन उभारण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

‘पीएम गती शक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन अंतर्गत नेटवर्क प्लॅनिंग ग्रुपच्या १०४ व्या बैठकीत कोकण रेल्वेच्या तिम्रया आर्थिक पुनर्रचना पॅकेजला तत्त्वत: मंजुरी मिळाली. या आराखड्यात गोव्यातील पेडणे आणि जुने गोवे येथील बोगद्यांना समांतर नवीन जुळे बोगदे बांधण्यासाठी कोटींहून अधिक निधीची तरतूद आहे. गोव्यातील मायें, न्यूरा-ओ-ग्रांदे आणि कर्नाटकातील मुकांबिका रोड-बायंदूर येथे नवीन क्रॉसिंग स्थानके प्रस्तावित आहेत. मात्र सावंतवाडी टर्मिनस आणि संपूर्ण कोकण मार्गाच्या दुहेरीकरणाचा यात समावेश नसल्याने प्रवाशांमध्ये तीव्र असंतोष असल्याचे संघटनेचे उपाध्यक्ष सागर तळवडेकर यांनी सांगितले. सावंतवाडी रेल्वे टर्मिनसचे भूमिपूजन २७ जून २०१५ रोजी तत्कालीन रेल्वेमंत्री सुरेश प्रभू आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झाले होते. मात्र एक तप उलटूनही केवळ निधीअभावी हा दर्जावाढ प्रकल्प रखडला आहे. कोकण आणि मुंबईतील लोकप्रतिनिधींच्या उदासीन कारभारामुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे संघटनेचे मत आहे.

# गणेशोत्सवात टपाल सेवा नागरिकांच्या दारी

धुरी एक्सप्रेस वृत्तसंस्था

**सिंधुदुर्ग:** जिल्ह्यात आंबोली घाटात दरडी कोसळलेल्या ठिकाणापासून काही अंतरावर मोठे दगड थेट मुख्य रस्त्यावर आल्याने काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. वाहतूक सुरू असतानाच हा प्रकार घडला. मात्र, सुदैवाने दगड कोसळण्याच्या वेळी त्या ठिकाणी कोणतेही वाहन नसल्याने मोठी दुर्घटना टळली.

आंबोली घाटातील ङङचार नंबर धबधब्याजवळङङ मुख्य रस्त्यावर दोन ते तीन मोठे दगड अचानक कोसळले. या मार्गावर नेहमीप्रमाणे वाहनांची वर्दळ सुरू होती. मात्र, दगड रस्त्यावर येताना त्या ठिकाणी वाहन नसल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. दगड कोसळल्यामुळे वाहतुकीवर परिणाम झाला.

## संपादकीय

# पाऊस येतोय... पण चिंता संपली आहे का?

महाराष्ट्राची ओळख ही केवळ किल्ले, संतपरंपरा आणि संस्कृतीमुळे नाही, तर शेती आणि शेतकऱ्यामुळेही आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्त्व आजही मोठे आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून शेतीसमोर एक नवे आणि गंभीर आव्हान उभे राहिले आहे. ते म्हणजे बदलते हवामान आणि अनिश्चित पाऊस कधी पाऊस वेळेवर येत नाही, तर कधी काही तासांतच महिन्याचा पाऊस पडतो. कधी पावसाची सुरुवात चांगली होते आणि ऐन पिकांच्या गरजेच्या वेळी पाऊस गायब होतो. या सगळ्याचा थेट परिणाम शेतकऱ्याच्या उत्पन्नावर होतो. यंदाही राज्यातील अनेक भागांत पावसाचे चित्र एकसारखे राहिलेले नाही. काही भागांत जोरदार पाऊस झाला, तर काही भागांत अपेक्षित पाऊस न झाल्याने शेतकरी चिंतेत आहे. पावसाच्या प्रत्येक अंदाजाकडे शेतकऱ्याचे लक्ष लागलेले असते. हवामान विभागाचा अंदाज असो किंवा स्थानिक हवामान तज्ज्ञांचा अंदाज असो, शेतकरी आकाशाकडे पाहत आपल्या पुढच्या दिवसाचे नियोजन करतो. कारण त्याच्यासाठी पाऊस हा केवळ हवामानाचा विषय नसून त्याच्या संपूर्ण कुटुंबाच्या भविष्याचा प्रश्न आहे. पूर्वी पावसाळा म्हणजे ठरावीक काळात येणारा आणि ठरावीक पद्धतीने पडणारा पाऊस, अशी एक सर्वसाधारण समजूत होती. मात्र आता परिस्थिती बदलताना दिसत आहे. पावसाचे दिवस कमी-जास्त होतात, पावसामध्ये मोठे खंड पडतात आणि काही वेळा अतिवृष्टीमुळे उभ्या पिकांचे नुकसान होते. एकीकडे पाण्याची कमतरता आणि दुसरीकडे अचानक येणारा मुसळधार पाऊस, या दोन्ही टोकांच्या परिस्थितीशी शेतकऱ्याला सामना करावा लागत आहे. विशेषत: सोयाबीन, कापूस, तूर, कांदा, ऊस, भाजीपाला आणि फळपिकांसारख्या पिकांवर हवामानातील बदलांचा परिणाम होतो. पिकाला नेमक्या कोणत्या टप्प्यावर किती पाणी आवश्यक आहे, याचे गणित शेतकरी अनुभवातून ठरवतो. परंतु हवामानच अनिश्चित झाले तर हे गणित चुकण्याची शक्यता वाढते. शेतकऱ्यांसाठी पाऊस महत्त्वाचा असला तरी पाऊस किती पडला, कधी पडला आणि कोणत्या भागात पडला, यावर शेतीचे भवितव्य अवलंबून असते.

उभ्या पिकाला योग्य वेळी पाणी मिळाले तर उत्पादन वाढू शकते. मात्र काढणीच्या काळात अतिवृष्टी झाली तर तयार झालेले पीकही हातातून जाऊ शकते. त्यामुळे पावसाचे प्रमाण जितके महत्त्वाचे आहे, तितकेच त्याचे वितरण आणि वेळही महत्त्वाची आहे. आज हवामानाचा अंदाज मोबाईलवर काही सेकंदांत मिळतो. मात्र अनेकदा जिल्ह्याच्या पातळीवर दिलेला अंदाज गावाच्या पातळीवर वेगळा ठरू शकतो. एका तालुक्यात मुसळधार पाऊस असताना काही किलोमीटर अंतरावर असलेल्या दुस्र्या गावात पावसाचा थेंबही पडत नाही, असे चित्र अनेकदा दिसते. म्हणून भविष्यात शेतकऱ्यांना ङङगाव आणि परिसराच्या पातळीवर अधिक अचूक हवामान माहिती मिळणे गरजेचे आहे. पाऊस कधी पडेल याबरोबरच पावसाचे संभाव्य प्रमाण, व्र्याचा वेग, तापमानातील बदल आणि पिकांवरील संभाव्य परिणाम याची माहिती वेळेवर मिळाली तर शेतकरी आपल्या शेतीचे नियोजन अधिक चांगल्या प्रकारे करू शकतो. हवामानाचा अंदाज मिळणे महत्त्वाचे आहे; पण अंदाज चुकला किंवा अचानक नैसर्गिक आपत्ती आली तर शेतक्र्याला आर्थिक आधारही मिळायला हवा. पीकविमा, नुकसानभरपाई, पंचनामे आणि सरकारी मदत या प्रक्रिया वेगाने आणि पारदर्शक पद्धतीने झाल्या पाहिजेत. अनेकदा नुकसान झाल्यानंतर शेतकऱ्याला कागदपत्रे, पंचनामे आणि विविध कार्यालयीन प्रक्रियांना सामोरे जावे लागते. संकटाच्या काळात ही प्रक्रिया सोपी झाली तर शेतकऱ्याला मोठा दिलासा मिळू शकतो. पावसाची अनिश्चितता वाढत असताना केवळ पावसावर अवलंबून राहणे पुरेसे नाही. पावसाचे पाणी अडवणे, जमिनीत मुरवणे, शेततळी, बंधारे, जलसंधारणाची कामे आणि सूक्ष्म सिंचन यावर अधिक भर देण्याची गरज आहे.

पावसाचे काही दिवस उपलब्ध होणारे पाणी योग्य पद्धतीने साठवले तर पावसात खंड पडल्यावर त्याचा उपयोग शेतीसाठी करता येऊ शकतो. त्यासाठी शासनाबरोबरच स्थानिक ग्रामसंस्था आणि शेतकरी यांचा सहभाग आवश्यक आहे. बदलत्या हवामानाचा विचार करून पिकांची निवड करण्याची वेळ आली आहे. एखाद्या भागात पाण्याची उपलब्धता कमी असेल तर कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्रोत्साहन मिळायला हवे. स्थानिक हवामान, जमिनीचा प्रकार आणि बाजारपेठ यांचा विचार करून पीक नियोजन केले तर हवामानाचा धोका काही प्रमाणात कमी करता येऊ शकतो. शेतकऱ्याला केवळ पीक असे सांगण्यापेक्षा त्या पिकासाठी आवश्यक पाणी, हवामान, खर्च, बाजारभाव आणि जोखीम याची संपूर्ण माहिती देणे अधिक महत्त्वाचे आहे. शेतकरी केवळ अन्नधान्य निर्माण करणारा उत्पादक नाही. तो देशाच्या अन्नसुरक्षेचा आधार आहे. त्यामुळे शेतीकडे केवळ उत्पादन आणि बाजारभावाच्या चौकटीत पाहण्याऐवजी हवामान बदलाच्या व्यापक संदर्भात पाहण्याची गरज आहे. पाऊस हा निसर्गाचा विषय आहे; त्यावर माणसाचे पूर्ण नियंत्रण असू शकत नाही. मात्र पावसाच्या अनिश्चिततेमुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी नियोजन नक्कीच करता येते. पावसाची वाट पाहणाऱ्या शेतकऱ्याला केवळ आश्वासनाची नव्हे, तर माहिती, तंत्रज्ञान आणि ठोस आधाराची आज गरज आहे.

# पितृपक्ष

## कृतज्ञतेची परंपरा जपणारा पंधरवडा



श्राद्ध, तर्पण आणि अन्नदानातून पितरांचे स्मरण; आधुनिक काळातही कायम आहे संस्कारांचे महत्त्व

भारतीय संस्कृतीमध्ये निसर्ग, समाज, कुटुंब आणि पूर्वज यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ज्या पूर्वजांच्या कष्टांवर आणि संस्कारांवर आपली आजची जडणघडण झाली आहे, त्यांच्या स्मृती जपणे आणि त्यांच्या ऋणात राहणे ही आपली नैतिक परंपरा मानली जाते. याच परंपरेशी जोडलेला काळ म्हणजे 'पितृपक्ष“. भाद्रपद पौर्णिमेनंतर सुरू होण्र्या या कृष्ण पक्षात दिवंगत पूर्वजांच्या आत्म्याच्या शांतीसाठी श्राद्ध, तर्पण, पिंडदान आणि अन्नदान केले जाते. आजच्या धावपळीच्या आणि एकाकी बनत चाललेल्या जीवनशैलीत पितृपक्ष हा केवळ धार्मिक विधी न राहता, कुटुंबाच्या मुळांशी आणि संस्कृतीशी पुन्हा जोडणारा महत्त्वाचा दुवा ठरत आहे.

**पितृपक्षाचे धार्मिक व आध्यात्मिक महत्त्व**

हिंदू धर्मशास्त्रानुसार पितृपक्षात पूर्वज सूक्ष्म रूपात येतात, अशी श्रद्धा आहे. श्रद्धेने केले जाणारे कर्म ते श्राद्ध अशी श्राद्धाची सोपी व्याख्या केली जाते. त्यामुळे या विधींमागे कर्मकांडापेक्षा आदर, आपुलकी आणि कृतज्ञतेची भावना अधिक महत्त्वाची असते. ज्या तिथीला घरातील व्यक्तीचे निधन झाले असेल, त्या तिथीला पितृपक्षात तिचे स्मरण करून श्राद्ध केले जाते. या काळात ब्राह्मण भोजन, गरजूंना दान आणि पशुपक्ष्यांना अन्न देण्याची प्रथा आहे.

**तर्पण आणि पिंडदानाची परंपरा**

तर्पण म्हणजे काय? तर्पण म्हणजे तृप्त करणे. जल, तीळ आणि मंत्रोच्चाराच्या साहाय्याने पूर्वजांना जल अर्पण केले जाते. पाणी हे जीवनाचे मूळ असल्याने जलार्पणातून पूर्वजांप्रती आदर व्यक्त केला जातो. तांदूळ, तीळ आणि जव यांपासून तयार केलेले पिंड पूर्वजांना अर्पण केले जातात. देशात गया, वाराणसी, तर महाराष्ट्रात नाशिक-त्र्यंबकेश्वर यांसारख्या तीर्थक्षेत्री पिंडदानासाठी विशेष गर्दी होते. मात्र घरी किंवा स्थानिक पातळीवरही श्रद्धेने हा विधी करता येतो. पितृपक्षातील शेवटचा दिवस म्हणजे 'सर्वपितृ अमावस्या“. ज्या पूर्वजांची मृत्यूतिथी माहीत नसेल, किंवा काही कारणाने नियमित तिथीला श्राद्ध करणे शक्य झाले नसेल, त्या सर्व ज्ञात-अज्ञात पितरांचे श्राद्ध या दिवशी केले जाते. भावनिकदृष्ट्या हा दिवस अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

**कावळ्याला घास आणि अन्नदानाची सामाजिक दृष्टी**

श्राद्धाच्या दिवशी कावळ्याला घास ठेवण्याची परंपरा पूर्वापार चालत आली आहे. लोकश्रद्धेनुसार कावळा हा पितरांचा प्रतिनिधी किंवा संदेशवाहक मानला जातो. या परंपरेकडे पर्यावरणीय दृष्टिकोनातून पाहिले, तर पक्षी आणि प्राण्यांना अन्न-पाणी उपलब्ध करून देण्याची निसर्गपूरक सवय यानिमित्ताने जोपासली जाते. पितृपक्षामुळे घरातील ज्येष्ठ मंडळी तरुण पिढीला पूर्वजांचे कष्ट, त्यांचे गुण आणि कुटुंबाचा इतिहास सांगतात. यामुळे नव्या पिढीला आपल्या वंशावळीची आणि मुळांची ओळख होते.

परंपरेचे आधुनिक रूप : आजच्या काळात अनेक कुटुंबे कर्मकांडाला फाटा देऊन सामाजिक बांधिलकी जपत आहेत. अनाथाश्रम आणि वृद्धाश्रमात अन्नदान करणे, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देणे, पूर्वजांच्या नावाने वृक्षारोपण करून ती झाडे जगवणे, अशा सेवाभावी उपक्रमांतून पितृपक्ष साजरा करण्याचा सकारात्मक बदल दिसून येत आहे.

**अंधश्रद्धा नव्हे, विवेकाची जोड**


पितृपक्षाकडे भीती किंवा अंधश्रद्धेच्या दृष्टीने न पाहता श्रद्धेने आणि विवेकाने पाहिले पाहिजे. कर्मकांडाचा अतिरेक किंवा अवाजवी खर्चापेक्षा पूर्वजांनी दिलेल्या तत्त्वांचे पालन करणे, त्यांनी दाखवलेल्या चांगल्या मार्गावर चालणे आणि समाजासाठी काहीतरी देणे, हीच खरी पितृसेवा आहे.

**निष्कर्ष : पूर्वजांच्या ऋणाची परतफेड**

काळ बदलला, तंत्रज्ञान आले आणि जीवनशैली गतिमान झाली, तरीही मुळांचा सन्मान करण्याची भारतीय परंपरा आजही अबाधित आहे. श्राद्धातून श्रद्धा, तर्पणातून कृतज्ञता आणि अन्नदानातून मानवता हाच पितृपक्षाचा खरा आणि व्यापक संदेश आहे. पूर्वजांनी दिलेले संस्कार पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे हीच त्यांच्या स्मृतीस वाहिलेली खरी आदरांजली ठरेल.

# कर्मवीर भाऊराव पाटील

## शिक्षणातून समाजपरिवर्तन घडवणारे युगपुरुष



'कमवा आणि शिका' या विचारातून वंचित, गरीब आणि ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली करणाऱ्या कर्मवीरांचे कार्य आजही प्रेरणादायी. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि शैक्षणिक इतिहासात काही व्यक्तिमत्त्वांचे योगदान इतके मोठे आहे की त्यांचे कार्य एका पिढीपुरते मर्यादित राहत नाही. पुढील अनेक पिढ्यांना त्यांच्या विचारांतून दिशा मिळत राहते. ङङकर्मवीर भाऊराव पाटीलङङ हे असेच एक महान समाजसुधारक, शिक्षणप्रेमी आणि परिवर्तनवादी विचारवंत होते. गरीब, ग्रामीण आणि वंचित समाजातील मुलांनाही शिक्षण मिळाले पाहिजे, या ध्येयाने त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षणाच्या प्रसारासाठी समर्पित केले.

भाऊराव पाटील यांचा जन्म २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. पुढे त्यांनी शिक्षण हे केवळश्रीमंतकिंवाशहरातीलविद्यार्थ्यांपुरते मर्यादित न राहता समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचले पाहिजे, असा विचार प्रत्यक्ष कृतीत आणला. त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शिक्षणाची एक मोठी चळवळ उभी राहिली. त्या काळात ग्रामीण भागातील अनेक मुलांना आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण घेणे शक्य नव्हते. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने मुलांना शिक्षणाऐवजी काम करावे लागत असे. शिक्षणाचा खर्च, राहण्याची व्यवस्था आणि शहरातील शैक्षणिक सुविधा या सर्व गोष्टी गरीब कुटुंबांसाठी मोठे आव्हान होते. भाऊराव पाटील यांनी ही परिस्थिती जवळून पाहिली. शिक्षणाच्या अभावामुळे समाजातील मोठा वर्ग मागे राहत असल्याची जाणीव त्यांना झाली. त्यामुळे शिक्षण सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा त्यांनी निर्धार केला. त्यांच्या मते शिक्षण म्हणजे केवळ अक्षरओळख नव्हे, तर ङङमाणसाला स्वाभिमानाने जगण्याची ताकद देणारे साधन आहे. त्यामुळे समाजाच्या तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवणे हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय बनले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्यातील सर्वांत महत्त्वाची संकल्पना म्हणजे 'कमवा आणि शिका' आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण घेता येत नसलेल्या विद्यार्थ्यांना काम करून स्वत:च्या शिक्षणाचा खर्च भागवता यावा, हा या विचारामागचा मुख्य उद्देश होता. या पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये श्रमाची प्रतिष्ठा निर्माण झाली. कोणतेही काम लहान-मोठे नसते, प्रत्येक श्रमाला सन्मान असतो, हा संदेश विद्यार्थ्यांना **(पान ४ वर)**

# घरगुती गणपती सजावट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## सोनवडेकर श्री लिंग सार्वजनिक समाज, मुंबईतर्फे विविध वाड्यांतील विजेत्यांचा गौरव

**कुडाळ :** सोनवडेकर श्री लिंग सार्वजनिक समाज, मुंबईतर्फे यंदाही घरगुती गणपती सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. गावातील विविध वाड्यांमध्ये घेण्यात आलेल्या या स्पर्धेला गणेशभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सामाजिक संदेश, पर्यावरणपूरक सजावट, कलात्मकता, भक्तिभाव, विज्ञान, निसर्ग, राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रीय एकात्मता आदी विषयांना सजावटीतून प्राधान्य देण्यात आले.

संस्थेच्या कार्यकारी मंडळाने नियुक्त केलेल्या परीक्षकांनी प्रत्येक घरातील गणपती सजावटीचे परीक्षण करून गुणांकन केले. सजावटीबरोबरच सुरक्षितता, पर्यावरणपूरकता आणि सामाजिक संदेश या बाबींचाही विचार करण्यात आला. स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने प्रत्येक वाडीनिहाय प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांची निवड करण्यात आली.

### देखाव्यातून सामाजिक संदेश

गावात गणपती सजावट स्पर्धा हा उपक्रम मागिल तीन वर्षांपासून यशस्वीरित्या राबविला जात आहे.त्याच फलित म्हणजे संस्थेचे सदस्य व ग्रामस्थ अमित पवार यांनी आपल्या गणपतीजवळ पुस्तकांचा उत्कृष्ट सजावट करून मोबाईलच्या युगात पुस्तक वाचनाची गरज असल्याचा एक सामाजिक संदेश दिला. आजच्या आधुनिक युगात मोबाईल आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झालेला आहे.माहिती, मनोरंजन आणि संवादासाठी मोबाईल अत्यंत आवश्यक आहे.परंतु ज्ञान विचारांची खोली आणि व्यक्तिमत्त्वाची जडणघडण या साठी पुस्तक वाचनाला पर्याय नाही. मोबाईलवर आपण अनेक गोष्टी पाहातो. पण पुस्तक आपल्याला विचार करायला शिकवते.मोबाईल वेळ खातो तर पुस्तक वाचलेला वेळ आपल्या आयुष्याला दिशा देतो.

दररोज काही वेळ मोबाईल बाजूला ठेवून एखादे चांगले पुस्तक वाचनाची सवय लावूया, आपल्या मुलांनाही मोबाईल पासून थोडे दूर ठेऊन, पुस्तकांची मैत्री करून देऊया. मोबाईल हातात असणे ही काळाची गरज आहे.पण पुस्तक हातात असणे ही ज्ञानाची गरज आहे. पुस्तक वाचनाची आवड असावी हा एक उत्कृष्ट सामाजिक संदेश आहे.

### वाडीनिहाय विजेते

**देऊळवाडी :** प्रथम रवींद्र तुकाराम धुरी; द्वितीय सुधीर वसंत धुरी; तृतीय विष्णू रामदास गुरव.
**बौद्ध वाडी :** प्रथम अमित सोनवडेकर; द्वितीय गोविंद सोनवडेकर; तृतीय भाईनाथ सोनवडेकर.
**फौजदार वाडी :** प्रथम सुधीर बळीराम धुरी; द्वितीय गोपाळ मारुती परब; तृतीय भरत शंकर धुरी.
**तळेकर वाडी :** प्रथम वासुदेव अर्जुन धुरी; द्वितीय नरेंद्र धुरी; तृतीय सीताराम संभाजी परब.
**मावळती वाडी :** प्रथम यशवंत धुरी; द्वितीय राजेंद्र धुरी; तृतीय शरद वसंत धुरी.
**भरड वाडी :** प्रथम रमण भिकाजी धुरी; द्वितीय अमित पवार; तृतीय अशोक दत्ताराम धुरी.
**बळीचे टेंब :** प्रथम समीर सहदेव घोगळे; द्वितीय अप्पा अंकुश मालंडकर; तृतीय राजेश मधुकर घोगळे.
**मठ वाडी :** प्रथम विश्राम पालकर; द्वितीय बाळकृष्ण भाऊ बळी; तृतीय चेतन सारंग.
**चिपकर वाडी :** प्रथम अशोक खंदारे; द्वितीय नाना सावंत; तृतीय किसन चव्हाण.

# कर्मवीर भाऊराव पाटील

**(पान ३ वरून)** मिळाला. तसेच शिक्षणाबरोबरच स्वावलंबन, शिस्त, कष्ट आणि आत्मविश्वास हे गुण विकसित करण्यावरही भर देण्यात आला. आजच्या काळात 'स्किल डेव्हलपमेंट', 'स्वावलंबन" आणि 'कमवा व शिका" यांसारख्या संकल्पनांवर मोठ्या प्रमाणावर चर्चा होते. मात्र भाऊराव पाटील यांनी या विचारांची अंमलबजावणी अनेक दशकांपूर्वी केली होती, हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. रयत शिक्षण संस्थाङङ ही भाऊराव पाटील यांच्या कार्याची सर्वांत मोठी देणगी मानली जाते. सामान्य शेतकरी, मजूर, कामगार आणि ग्रामीण कुटुंबातील मुलांना शिक्षण मिळावे, या उद्देशाने त्यांनी शिक्षणाची चळवळ उभी केली. 'रयत' म्हणजे सामान्य जनता. समाजातील सामान्य माणसाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा उद्देश या संस्थेच्या कार्यामागे होता. गावोगावी शाळा आणि शिक्षणाच्या सुविधा निर्माण करून ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी देण्याचे मोठे काम रयत शिक्षण संस्थेने केले. या संस्थेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊन पुढे विविध क्षेत्रांत गेले. शिक्षक, अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक आणि विविध क्षेत्रांतील व्यावसायिक घडविण्यात या शैक्षणिक चळवळीचे योगदान राहिले आहे. भाऊराव पाटील यांचे कार्य केवळ शाळा आणि महाविद्यालये उभारण्यापुरते मर्यादित नव्हते. शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील विषमता कमी झाली पाहिजे, असा त्यांचा व्यापक दृष्टिकोन होता. जात, धर्म, आर्थिक परिस्थिती किंवा सामाजिक स्तर यांवरून विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव होऊ नये, अशी त्यांची भूमिका होती. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये समानता, बंधुभाव आणि सामाजिक जाणीव निर्माण व्हावी, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या कार्यातून शिक्षण सर्वांसाठी हा विचार महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात अधिक दृढ झाला.

शहरांमध्ये शिक्षणाच्या तुलनेने अधिक सुविधा उपलब्ध असताना ग्रामीण भागात शाळा, शिक्षक आणि वसतिगृहांची कमतरता होती. ही दरी कमी करण्यासाठी भाऊराव पाटील यांनी ग्रामीण भागाला केंद्रस्थानी ठेवले. गावातील मुलांना शिक्षणासाठी शहरात स्थलांतर करण्याची वेळ येऊ नये आणि गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी, यासाठी त्यांनी वसतिगृहे आणि शैक्षणिक सुविधा उभारण्यावर भर दिला. यामुळे ग्रामीण भागातील अनेक पिढ्यांना शिक्षणाचा मार्ग खुला झाला. आज शिक्षणाची साधने मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाली आहेत. इंटरनेट, ऑनलाइन शिक्षण, डिजिटल वर्ग, स्मार्टफोन आणि विविध शैक्षणिक सुविधा यामुळे शिक्षणाचे स्वरूप बदलले आहे. मात्र आर्थिक आणि सामाजिक विषमता आजही पूर्णपणे संपलेली नाही. ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, डिजिटल सुविधा आणि रोजगाराभिमुख कौशल्ये उपलब्ध करून देणे हे आजही आव्हान आहे. अशा वेळी भाऊराव पाटील यांचा ङङशिक्षण सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो.

शिक्षणाबरोबर श्रमाची प्रतिष्ठा, स्वावलंबन आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्वही त्यांच्या विचारांतून अधोरेखित होते. महापुरुषांची जयंती साजरी करणे म्हणजे केवळ त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करणे नव्हे. त्यांच्या विचारांचा आपल्या जीवनात आणि समाजात उपयोग करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरते. आज एखाद्या गरीब विद्यार्थ्याला शिक्षणासाठी मदत करणे, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, शिक्षणापासून वंचित मुलांना शैक्षणिक संधी उपलब्ध करून देणे किंवा श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त करून देणे या कृतींमधून भाऊराव पाटील यांच्या विचारांची खरी अंमलबजावणी होऊ शकते. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाची ज्योत केवळ पेटवली नाही, तर ती महाराष्ट्राच्या गावागावात पोहोचवण्याचे काम केले.ङङ त्यांच्या कार्यामुळे शिक्षण हे काही मोजक्या लोकांचे विशेषाधिकार न राहता सामान्य जनतेच्या प्रगतीचे साधन बनले. आज त्यांच्या स्मृतीकडे पाहताना एक गोष्ट स्पष्टपणे बदलायची असेल तर शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली करावी लागतील आणि शिक्षणासोबत श्रम, स्वाभिमान, समता आणि माणुसकीची मूल्ये रुजवावी लागतील. याच विचारांमुळे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कार्य काळाच्या पुढे जाणारे ठरते. महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि सामाजिक इतिहासात त्यांचे नाव सदैव आदराने घेतले जाईल.




हे साप्ताहिक वृत्तपत्र डिजिटल स्वरूपात वाचकांसाठी उपलब्ध आहे. धुरी एक्सप्रेस ही संस्था या वृत्तपत्राची मालक आहे. धुरी एक्सप्रेस डॉट कॉम या संकेतस्थळावर वृत्तपत्र प्रकाशित केले आहे. या डिजिटल अंकाचे सर्व हक्क प्रकाशक संस्थेकडे सुरक्षित आहेत. या अंकाची विक्री करणे किंवा अनधिकृत व्यावसायिक वापर करणे कायदेशीर गुन्हा आहे. संपादक : धुरी एक्सप्रेस.
संपर्क : https://dhuriexpress.com/ : ईमेल : dhuriexpress123@gmail.com, https://www.youtube.com/@dhuriexpress123, https://www.facebook.com/dhuriexpress123, https://x.com/dhuriexpress123, https://t.me/dhuriexpress123, https://www.instagram.com/dhuriexpress